# देगलूर महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिवस व दक्षता जनजागृती सप्ताह साजरा

देगलूर | प्रतिनिधी: अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित, देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'राष्ट्रीय एकता दिवस' व दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. सर्वप्रथम लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती व भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी 'राष्ट्रीय एकात्मतेची शपथ' व दक्षता जनजागृती सप्ताह निमित्त 'भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ' दिली. या कार्यक्रमाकरिता उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार व उपप्राचार्य प्रा.उत्तमकुमार कांबळे कार्यक्रमाधिकारी प्रा.विनोद काळे,प्रा.व्यंकट खंदकुरे,प्रा.गणेश क्यादारे, पर्यवेक्षक संग्राम पाटील, कार्यालयीन अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner